सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# भूमि अभिलेख विभाग

गट-क संवर्गातील सरळसेवेने रिक्त पदे भरण्याबाबतची जाहिरात क्र. ०१/२०२५
शासन मान्यता पत्र क्रमांक : ससेभ-०८२५/प्र.क्र.२७४/आस्था-०६, दिनांक २१/०८/२०२५.

भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमुह ४ (भूकरमापक) संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी विहीत अर्हता धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांकडून स्पर्धात्मक परीक्षेसाठी केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावयाची सुविधा विभागाच्या https://ibpsreg.ibps.in/gomsep25/ व https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०१/१०/२०२५ ते २४/१०/२०२५ पर्यंत उपलब्ध राहील.

| अ.क्र. | भरती प्रक्रिया कार्यक्रम | |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | दिनांक ०१/१०/२०२५ सकाळी ११.०० ते दिनांक २४/१०/२०२५ रात्री २३.५९ पर्यंत |
| २ | ऑनलाईन शुल्क भरण्याचा कालावधी | दिनांक ०१/१०/२०२५ सकाळी ११.०० ते दिनांक २४/१०/२०२५ रात्री २३.५९ पर्यंत |
| ३ | परीक्षेचा प्रस्तावित दिनांक | १३ व १४ नोव्हेंबर, २०२५ *** |

***** नियोजनच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार परीक्षेच्या दिनांकामध्ये बदल होवू शकतो.**

भरती प्रक्रिये संदर्भातील सर्व कार्यक्रम व सूचना विभागाच्या वरील संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील. भरती प्रक्रिये संदर्भातील निर्णयाचे सर्व अधिकार जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम राहील.

१. भरावयाच्या पदांचा तपशील
पदाचे नाव व वेतनश्रेणी - भूकरमापक,
वेतन स्तर एस-६ (रु. १९९०० - रु. ६३२००)

(i) विभाग - उपसंचालक भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे

| अ. क्र. | प्रवर्ग आरक्षण | माजी सैनिक १५% | प्रकल्पग्रस्त ५% | भूकंपग्रस्त २% | महिला ३०% | खेळाडू ५% | अंशकालीन १०% | समांतर आरक्षण विरहीत | एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनु. जाती | १ | ० | ० | २ | ० | १ | १ | ५ |
| | अनु. जमाती | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| | वि.जा.अ | ० | ० | ० | १ | ० | ० | २ | ३ |
| | भ.ज. ब | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | भ.ज. क | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भ.ज. ड | ० | ० | ० | १ | ० | ० | २ | ३ |
| | वि.मा.प्र. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | इ.मा.व. | ४ | १ | १ | ८ | १ | ३ | ७ | २५ |
| | एस.ई.बी.सी. | १ | ० | ० | २ | ० | १ | ४ | ८ |
| | ईडब्ल्यूएस | १ | ० | ० | ३ | ० | १ | ४ | ९ |
| | अराखीव | ४ | १ | १ | ८ | १ | ३ | ९ | २७ |
| | **एकूण** | ११ | २ | २ | २६ | २ | ९ | ३१ | ८३ |
| | दिव्यांगाकरीता राखीव - **एकुण- ०४,** (अल्पदृष्टी- १, श्रवणदोष-१, अस्थीव्यंग-१, स्वमग्नता/मंदबुद्धी व वरील एकापेक्षा अधिक जास्त प्रकारचे दिव्यांग- १) | | | | | | | | |
| | अनाथांकरीता राखीव- एकूण- ०१ (संस्थात्मक- १, संस्थाबाह्य-०) | | | | | | | | |

(ii) विभाग - उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई

| अ. क्र. | प्रवर्ग आरक्षण | माजी सैनिक १५% | प्रकल्पग्रस्त ५% | भूकंपग्रस्त २% | महिला ३०% | खेळाडू ५% | अंशकालीन १०% | समांतर आरक्षण विरहीत | एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अनु. जाती | ४ | १ | १ | ८ | १ | ३ | ८ | **२६** |
| | अनु.जमाती | २ | १ | ० | ४ | १ | १ | ४ | **१३** |
| | वि.जा.अ | १ | ० | ० | २ | ० | १ | ३ | **७** |
| | भ.ज. ब | १ | ० | ० | २ | ० | १ | २ | **६** |
| | भ.ज. क | १ | ० | ० | २ | ० | १ | २ | **६** |
| | भ.ज. ड | १ | ० | ० | २ | ० | १ | १ | **५** |
| २ | वि.मा.प्र. | १ | ० | ० | १ | ० | ० | २ | **४** |
| | इ.मा.व. | ७ | २ | १ | १५ | २ | ५ | १७ | **४९** |
| | एस.ई.बी.सी. | ४ | १ | १ | ८ | १ | ३ | ८ | **२६** |
| | ईडब्ल्यूएस | ६ | २ | १ | ११ | २ | ४ | १२ | **३८** |
| | अराखीव | १२ | ४ | २ | २४ | ४ | ८ | २५ | **७९** |
| | **एकूण** | ४० | ११ | ६ | ७९ | ११ | २८ | ८४ | **२५९** |
| | दिव्यांगाकरीता राखीव - **एकुण**- १० (अल्पदृष्टी- ३, श्रवणदोष- ३, अस्थीव्यंग- २, स्वमग्नता/मंदबुद्धी व वरील एकापेक्षा अधिक जास्त प्रकारचे दिव्यांग-२) | | | | | | | | |
| | अनाथांकरीता राखीव- **एकूण**- ०३ (संस्थात्मक- २, संस्थाबाह्य-१) | | | | | | | | |

(iii) विभाग - उपसंचालक भूमि अभिलेख, नाशिक प्रदेश, नाशिक

| अ. क्र. | प्रवर्ग आरक्षण | माजी सैनिक १५% | प्रकल्पग्रस्त ५% | भूकंपग्रस्त २% | महिला ३०% | खेळाडू ५% | अंशकालीन १०% | समांतर आरक्षण विरहीत | एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | अनु. जाती | १ | ० | ० | ३ | ० | १ | ३ | ८ |
| | अनु.जमाती | २ | १ | ० | ३ | १ | १ | २ | १० |
| | वि.जा.अ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भ.ज. ब | ० | ० | ० | १ | ० | ० | २ | ३ |
| | भ.ज. क | १ | ० | ० | १ | ० | ० | २ | ४ |
| | भ.ज. ड | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | वि.मा.प्र. | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | इ.मा.व. | ४ | १ | १ | ८ | १ | ३ | ९ | २७ |
| | एस.ई.बी.सी. | २ | १ | ० | ४ | १ | १ | ३ | १२ |
| | ईडब्ल्यूएस | २ | १ | ० | ३ | १ | १ | ३ | ११ |
| | अराखीव | ७ | २ | १ | १४ | २ | ५ | १६ | ४७ |
| | **एकूण** | १९ | ६ | २ | ३७ | ६ | १२ | ४२ | १२४ |
| | दिव्यांगाकरीता राखीव - **एकुण**- ०५ (अल्पदृष्टी-२, श्रवणदोष- १, अस्थीव्यंग- १, स्वमग्नता/मंदबुद्धी व वरील एकापेक्षा अधिक जास्त प्रकारचे दिव्यांग- १) | | | | | | | | |
| | अनाथांकरीता राखीव- **एकूण**- ०१ (संस्थात्मक- १, संस्थाबाह्य-००) | | | | | | | | |

(iv) विभाग - उपसंचालक भूमि अभिलेख, छ. संभाजीनगर प्रदेश, छ.संभाजीनगर

| अ. क्र. | प्रवर्ग आरक्षण | माजी सैनिक १५% | प्रकल्पग्रस्त ५% | भूकंपग्रस्त २% | महिला ३०% | खेळाडू ५% | अंशकालीन १०% | समांतर आरक्षण विरहीत | एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | अनु. जाती | ४ | १ | १ | ८ | १ | ३ | ९ | **२७** |
| | अनु.जमाती | २ | १ | ० | ४ | १ | १ | ४ | **१३** |
| | वि.जा.अ | १ | ० | ० | २ | ० | १ | ४ | **८** |
| | भ.ज. ब | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | **२** |
| | भ.ज. क | १ | ० | ० | २ | ० | १ | १ | **५** |
| | भ.ज. ड | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | **१** |
| | वि.मा.प्र. | १ | ० | ० | १ | ० | ० | २ | **४** |
| | इ.मा.व. | ८ | ३ | १ | १६ | ३ | ५ | १८ | **५४** |
| | एस.ई.बी.सी. | ५ | २ | १ | ११ | २ | ४ | १० | **३५** |
| | ईडब्ल्यूएस | ३ | १ | ० | ६ | १ | २ | ८ | **२१** |
| | अराखीव | ६ | २ | १ | १२ | २ | ४ | १३ | **४०** |
| | **एकूण** | **३१** | **१०** | **४** | **६३** | **१०** | **२१** | **७१** | **२१०** |
| | दिव्यांगाकरीता राखीव - **एकुण**- ०८ (अल्पदृष्टी- २, श्रवणदोष- २, अस्थीव्यंग- ०, स्वमग्नता/मंदबुद्धी व वरील एकापेक्षा अधिक जास्त प्रकारचे दिव्यांग-४ ) | | | | | | | | |
| | अनाथांकरीता राखीव- **एकूण**- ०२ (संस्थात्मक- १, संस्थाबाह्य- १) | | | | | | | | |

(v) विभाग - उपसंचालक भूमि अभिलेख, अमरावती प्रदेश, अमरावती

| अ. क्र. | प्रवर्ग आरक्षण | माजी सैनिक १५% | प्रकल्पग्रस्त ५% | भूकंपग्रस्त २% | महिला ३०% | खेळाडू ५% | अंशकालीन १०% | समांतर आरक्षण विरहीत | एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | अनु. जाती | १ | ० | ० | २ | ० | १ | १ | **५** |
| | अनु.जमाती | २ | १ | ० | ४ | १ | १ | ३ | **१२** |
| | वि.जा.अ | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | **२** |
| | भ.ज. ब | १ | ० | ० | २ | ० | १ | १ | **५** |
| | भ.ज. क | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | **१** |
| | भ.ज. ड | ० | ० | ० | १ | ० | ० | २ | **३** |
| | वि.मा.प्र. | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | **१** |
| | इ.मा.व. | २ | १ | ० | ४ | १ | १ | ३ | **१२** |
| | एस.ई.बी.सी. | २ | १ | ० | ४ | १ | १ | ३ | **१२** |
| | ईडब्ल्यूएस | १ | ० | ० | ३ | ० | १ | ४ | **९** |
| | अराखीव | ८ | ३ | १ | १७ | ३ | ६ | १७ | **५५** |
| | **एकूण** | **१७** | **६** | **१** | **३८** | **६** | **१२** | **३७** | **११७** |
| | दिव्यांगाकरीता राखीव - **एकुण**- ०५ (अल्पदृष्टी- १, श्रवणदोष-२, अस्थीव्यंग- ०, स्वमग्नता/मंदबुद्धी व वरील एकापेक्षा अधिक जास्त प्रकारचे दिव्यांग-२ ) | | | | | | | | |
| | अनाथांकरीता राखीव- **एकूण**-०१ (संस्थात्मक- १, संस्थाबाह्य- ०) | | | | | | | | |

(vi) विभाग - उपसंचालक भूमि अभिलेख, नागपुर प्रदेश, नागपुर

| अ. क्र. | प्रवर्ग आरक्षण | माजी सैनिक १५% | प्रकल्पग्रस्त ५% | भूकंपग्रस्त २% | महिला ३०% | खेळाडू ५% | अंशकालीन १०% | समांतर आरक्षण विरहीत | एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | अनु. जाती | १ | ० | ० | १ | ० | १ | २ | ५ |
| | अनु.जमाती | १ | ० | ० | १ | ० | १ | २ | ५ |
| | वि.जा.अ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भ.ज. ब | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भ.ज. क | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| | भ.ज. ड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | वि.मा.प्र. | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | इ.मा.व. | ४ | १ | १ | ८ | १ | ३ | ८ | २६ |
| | एस.ई.बी.सी. | २ | १ | ० | ३ | १ | १ | ३ | ११ |
| | ईडब्ल्यूएस | २ | १ | ० | ५ | १ | २ | ५ | १६ |
| | अराखीव | ७ | २ | १ | १३ | २ | ४ | १५ | ४४ |
| | **एकूण** | १७ | ५ | २ | ३२ | ५ | १२ | ३७ | ११० |
| | दिव्यांगाकरीता राखीव - **एकुण**-०४ (अल्पदृष्टी- १, श्रवणदोष- १, अस्थीव्यंग- १, स्वमग्नता/मंदबुद्धी व वरील एकापेक्षा अधिक जास्त प्रकारचे दिव्यांग- १) | | | | | | | | |
| | अनाथांकरीता राखीव- **एकूण**- ०१ (संस्थात्मक- १, संस्थाबाह्य-०) | | | | | | | | |

- सर्व विभागांकरीता एकाच परीक्षेच्या आधारे विभागनिहाय स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे एका उमेदवारास कोणत्याही एकाच विभागकरीता अर्ज सादर करता येईल. उमेदवाराने वरील तक्त्यात नमूद विभागनिहाय उपलब्ध पदांचे अवलोकन करुन ऑनलाईन अर्जामध्ये विभागाची निवड करावी.

२. वयोमर्यादा व विहित शैक्षणिक अर्हता:

उमेदवाराने अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास (दिनांक २४/१०/२०२५) रोजी धारण केलेली असावी.

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | अर्हता / अनुभव | किमान व कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|---|
| १ | गट – क<br>भूकरमापक | १) मान्यता प्राप्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील किंवा मान्यता प्राप्त संस्थेकडील स्थापत्य अभियांत्रिकी पदविका (Diploma in Civil Engineering) किंवा माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण केल्यावर मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे दोन वर्षांचे सर्वेक्षक व्यवसायाचे प्रमाणपत्र.**<br>२) मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. आणि इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. गतीचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखन प्रमाणपत्र.<br>उपरोक्त क्र. (२) मध्ये नमुद टंकलेखन विषयक अर्हता पूर्ण करत नसलेली व्यक्ती सदर पदासाठी अर्ज करण्यास पात्र ठरेल. परंतु, अशा व्यक्तीने सदर अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत सदर अर्हता धारण न केल्यास तो/ती सेवा समाप्तीस पात्र राहील. | १८ ते ३८ |

**** केंद्र शासनाच्या मा. महासंचालक, रोजगार व प्रशिक्षण क्र. DGE&T-१९/०६(१)/ २०१४-CD, दिनांक ०४ जुलै २०१४ अन्वये औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिकवला जाणाऱ्या सर्व्हेअर अभ्यासक्रमाचा कालावधी प्रवेश सत्र ऑगस्ट २०१४ पासून एक वर्ष कालावधीचा झालेला आहे. त्यानुसार अभ्यासक्रम पुर्ण करुन त्याबाबतचे वैध प्रमाणपत्र धारण करणारे उमेदवार वरील पदाकरीता अर्ज करण्यास तसेच परिक्षेस बसण्यास पात्र असतील, मात्र त्याबाबत शासनाकडून प्राप्त होणाऱ्या पुढील आदेशानुसार त्यांचे निवडीबाबत कार्यवाही करण्यात येईल व त्याबाबत शासनाकडील निर्णय अंतिम राहील.**

| अ.क्र. | खालील उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादेत शिथीलता राहील | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय प्रवर्गात मोडणारे उमेदवारा यांचेसाठी | कमाल वयोमर्यादेच्या ५ वर्ष अधिक |
| २ | प्रकल्पग्रस्त यांचेसाठी | ४५ वर्षांपर्यंत |
| ३ | दिव्यांग असणाऱ्या (Person with Disability) उमेदवार यांचेसाठी | ४५ वर्षांपर्यंत |
| ४ | अ) माजी सैनिक यांचेसाठी | विहीत वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्ष इतका राहील. |
| | आ) दिव्यांग असणाऱ्या (Person with Disability) माजी सैनिक यांचेसाठी | ४५ वर्षांपर्यंत |
| ५ | अंशकालीन उमेदवार यांचेसाठी | ५५ वर्षांपर्यंत |
| ६ | खेळाडू उमेदवार यांचेसाठी | ५ वर्ष पर्यंतची अट शिथील. जास्तीत जास्त ४३ वर्षापर्यंत |
| ७ | भूकंपग्रस्त उमेदवार यांचेसाठी | ४५ वर्षापर्यंत |
| ८ | स्वातंत्र संग्राम सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य, १९९१ चे जनगणना कर्मचारी व १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी उमेदवार यांचेसाठी | ४५ वर्षापर्यंत |

३. परीक्षेचे स्वरुप :-

| अ.क्र. | विषय | एकूण प्रश्न | कमाल गुण | परीक्षेचे माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | २५ | ५० | इंग्रजी | ३० मिनीट |
| २ | मराठी | २५ | ५० | मराठी | ३० मिनीट |
| ३ | सामान्य ज्ञान | २५ | ५० | मराठी व इंग्रजी | ३० मिनीट |
| ४ | बौद्धीक चाचणी / अंकगणित | २५ | ५० | | ३० मिनीट |
| | | १०० | २०० | | १२० मिनीट |

४. **परीक्षा शुल्क :**

अमागास प्रवर्ग : रु. १०००/-

मागास प्रवर्ग : रु. ९००/-

टिप : अ) वर दर्शविण्यात आलेले परीक्षा शुल्क हे बँक प्रोसेसिंग शुल्क (लागू असेल तर) वगळून आहे. परीक्षा शुल्क फक्त ऑनलाईन पद्धतीनेच स्विकारले जाईल. तसेच परीक्षा शुल्काची रक्कम ही ना परतावा असेल.

ब) माजी सैनिकांना परीक्षा शुल्क लागू असणार नाही.

५.    निवडीचे निकष :

गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने ऑनलाईन (Computer Based Test) परीक्षेत एकूण गुणांच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

पदासाठी विहित केलेल्या अर्हता/ अटी/ शर्ती पूर्ण करणाऱ्या पात्र उमेदवारांची सदर परीक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे बनविलेल्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांकडून विहित आरक्षणानुसार निवड यादी बनविण्यात येईल.

एकाच पदासाठी दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास दि. ०४/०५/२०२२ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद खालील प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड केली जाईल :-

१) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील.

२) समान गुणप्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य नसेल अथवा वरील अ.क्र. १ नुसार एकापेक्षा अधिक उमेदवार समान गुणप्राप्त असतील तर त्यापैकी वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

३) वरील अनु क्र. १ व २ या दोन्ही अटीमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अर्हता (पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे ) धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

४) वरील अनु.क्र. १, २ व ३ या तिन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

(टीप :- आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य म्हणजे शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. एससीवाय- १२०५/प्र.क्र.१८९/म-७, दि. २३ जानेवारी, २००६ अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटुंबास शेतकऱ्याच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटुंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य (पत्नी/मुलगे/मुलगी) होय.)

६. वरील पदांकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांकरीता सूचना :

१) उपरोक्त पदांच्या सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज https://ibpsreg.ibps.in/gomsep25/ व https://mahabhumi.gov.in संकेतस्थळावर दि. ०१/१०/२०२५ पासून ते दि. २४/१०/२०२५ पर्यंत मागविण्यात येत आहेत.

२) एका उमेदवारास कोणत्याही एका विभागाकरीता अर्ज सादर करता येईल. एका उमेदवाराने एकापेक्षा अधिक अर्ज सादर केल्याचे आढळल्यास अशा उमेदवाराचा सर्वात शेवटी परिपुर्णपणे भरलेल्या अर्जात नमूद विभागाकरीता अर्ज सादर केल्याचे ग्राह्य धरुन इतर सर्व अर्ज बाद समजण्यात येतील व त्याबाबत कोणत्याही पत्रव्यवहाराची / तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

३) विहीत पध्दतीने मुदतीत म्हणजेच दिनांक २४/१०/२०२५ पुर्वी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी शुल्क भरण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने रक्कम भरण्याची कार्यवाही दि. २४/१०/२०२५ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

४) ऑनलाईन स्पर्धात्मक परीक्षा स्थगित व रद्द करणे, परीक्षेचे स्वरुप, तारीख व ठिकाणात बदल करणे, पदसंख्या, अनुशेष व आरक्षण यात वाढ किंवा घट करण्याचे अधिकार विभागास राहतील व विभागाचा निर्णय अंतिम असेल. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही. वर दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार प्राप्त न झाल्यास सामाजिक आरक्षणाच्या त्याच राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा नियमानुसार विचार केला जाईल. तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वा तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांना राहील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

५) ज्या उमेदवारांनी यापूर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/समाज कल्याण/आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी/जिल्हा सैनिक बोर्ड/अपंग कल्याण कार्यालय इ. कार्यालयात नोंदविलेले आहे अशा उमेदवारांना देखील परीक्षेसाठी स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन इत्यादी समांतर आरक्षणांतर्गत येणाऱ्या उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत संकेतस्थळावर स्वतंत्रपणे अर्ज ऑनलाईनच सादर करणे आवश्यक आहे.

६) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा, शिथीलीकरण इत्यादी पात्रता तपासूनच उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरावा.

७) उमेदवारांची परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी/छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. उमेदवारांना ऑनलाईन (Computer Based Test) आधारीत परीक्षेतील मिळालेल्या गुणांच्या आधारे तसेच त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे सर्व अधिकार भूमि अभिलेख विभाग राखून ठेवीत आहे.

८) परीक्षेच्या वेळी परीक्षा केंद्रात किंवा परीक्षा परीसरात मोबाईल, गणकयंत्र (कॅल्क्युलेटर), आयपॅड तत्सम इलेक्ट्रॉनिक यंत्रे किंवा इतर संपर्काची साधने वापरण्यास सक्त मनाई आहे.

९) उमेदवार हा महाराष्ट्र राज्यातील वैध अधिवास प्रमाणपत्र धारण करणारा असावा. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मकसी १००७/प्र.क्र. ३६/ का. ३६, दि. १०/०७/२००८ अन्वये महाराष्ट्र-कनार्टक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषीक उमेदवारांना सदर पदासाठी अर्ज करता येईल.

१०) इतर राज्यातून महाराष्ट्रात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्ग उमेदवारांचा आरक्षित पदांकरीता विचार केला जाणार नाही.

११) उमेदवारास परीक्षा/कागदपत्र पडताळणी इत्यादी करीता स्वखर्चाने यावे लागेल.

१२) ऑनलाईन (CBT) परीक्षा महाराष्ट्रातील प्रमुख शहरांच्या ठिकाणी घेण्यात येणार आहे. आवश्यकतेनुसार परीक्षा स्थळामध्ये वाढ /बदल करण्याचे अधिकार भूमि अभिलेख विभागाकडे राहतील. परीक्षेचे ठिकाण, वेळ, दिनांक उमेदवारांना परीक्षेपुर्वी किमान ७ दिवस आधी उपलब्ध करण्यात येतील.

१३) परीक्षेचे प्रवेश पत्र उक्त संकेतस्थळावरुन स्वत: डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची असेल. प्रवेशपत्र इतर कोणत्याही पध्दतीने पाठविले जाणार नाही.

१४) पात्र उमेदवारांचा अंतिम निकाल वरील संकेतस्थळावर जाहिर करण्यात येईल.

## ७. सर्वसाधारण अटी :

१) शासन निर्णय सा.प्र.वि. क्रमांक प्रशासन २०००/प्र.क्र.५/२००१/३२, दि. २०/०७/२००२ व दि. १९/०३/२००३ शासन निर्णयानुसार उपरोक्त पदांकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र.मातंसं २०१५/प्र.क्र.२७७/३९ दिनांक ०४/०२/२०१३, सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) शासन पुरकपत्र दिनांक ०८/०१/२०१८ व दिनांक १६/०७/२०१८ मध्ये नमुद केल्याप्रमाणे अथवा महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहीत केलेले संगणक हाताळणे/वापराबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनाकांपासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल.

२) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. (वैध डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

३) निवड झालेल्या उमेदवाराने जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शासकीय सेवा करण्याकरीता शारीरीक क्षमतेचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४) महाराष्ट्र शासनाने माध्यमिक शालांत परीक्षेशी समकक्ष ठरवलेली परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या उमेदवारांस महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाकडून/शासनाकडून अशा परीक्षेची समकक्षता पडताळणी करुन घेतल्यानंतरच नियुक्ती दिली जाईल.

५) निवड यादीतील उमेदवाराने नियुक्तीपूर्वी मूळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला, जात प्रमाणपत्र, सन २०२५-२६ (चालू वित्तीय वर्षाचे) साठी वैध असलेला नॉन क्रिमीलेअर दाखला (आवश्यक त्या प्रवर्गासाठी). तसेच समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र त्याचप्रमाणे इतर आवश्यक ती प्रमाणपत्रे कागदपत्रांच्या मूळ प्रती तसेच त्यांच्या छायांकित प्रती छाननीसाठी तपासणीसाठी

नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्रे कागदपत्रे यांची छाननी नियुक्ती प्राधिकारी यांचे स्तरावर केली जाईल. व तद्‌नंतरच नियुक्तीस पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येतील. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. छाननी अंती वरील प्रमाणपत्रे (कागदपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास /माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही/ नियुक्ती रद्द होईल.

६) सदर पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीस १ वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी लागू राहील. (परिविक्षा कालावधी जास्तीत जास्त १ वर्षापर्यंत वाढविता येईल). या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीस परिविक्षाधीन कालावधीत, विहीत केलेले भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी, छ.संभाजीनगर येथील प्रशिक्षण पूर्ण करणे, या पदासाठी विहीत सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण करणे आणि परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. जर त्याने/तिने विहीत प्रशिक्षण पूर्ण केले नाही अथवा सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण केली नाही अथवा परिविक्षाधीन कालावधी समाधानकाररित्या पूर्ण केला नाही अथवा त्या पदावर काम करण्यास योग्य नसल्याचे आढळून आल्यास तो/ती सेवा समाप्तीस पात्र राहील.

- **आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (ई.डब्ल्यू.एस.) आरक्षण-**
  - खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (ई.डब्ल्यू.एस.) वर्गातील उमेदवारांकरीता सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.राआधी-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि.१२/०२/२०१९ अन्वये विहित करण्यात आलेले कागदपत्रे/पुरावा (परिशिष्ट-क) आणि स्वयंघोषणापत्र (परिशिष्ट-ड) पडताळणीच्या वेळी आवश्यक राहील. तसेच आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराच्या /उमेदवाराच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.८ लाखाच्या आत असले पाहिजे व ती व्यक्ती किंवा तिचे कुटुंबीय महाराष्ट्र राज्यात दि. १३/१०/१९६७ रोजी किंवा त्यापूर्वीचे रहिवासी असणे आवश्यक राहील.
  - सदर प्रवर्गातील उमेदवारांकरीता वय, परीक्षा फी व इतर अनुज्ञेय सवलती ह्या इतर मागास प्रवर्गास राज्य शासनाने वेळोवेळी लागू केलेल्या नियमानुसार राहतील.

- **सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास आरक्षण :-**
  - सदर जाहिरात सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग अधिनियम दि. २६ फेब्रुवारी २०२४ व संबंधीत शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ च्या अधिन असेल. या संदर्भात मा. उच्च न्यायालयात दाखल झालेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायानिर्णयाच्या अधीन राहून जाहिरात प्रसिद्ध करण्यात येत आहे. या जाहिराती संबंधीत शिफारसी व

नियुक्त्या मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट याचिका क्रमांक ३४६८/२०२४ व इतर न्यायिक प्रकरणाच्या अधीन राहून करण्यात येतील.

- दिव्यांग व्यक्तींचे आरक्षण :-

  - दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६अ, दि. २९ मे २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

    महसुल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक आस्था-२०२०/प्र.क्र.१५८/ई-६, दि. २९/०६/२०२१ अन्वये पुढील तक्त्यातील संवर्गासमोर नमूद केलेले दिव्यांग प्रवर्गातील व्यक्ती /उमेदवार सदर पदाकरीता आरक्षणांतर्गत पदांकरीता अर्ज करण्यास पात्र आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदाकरीता निश्चित करण्यात आलेला दिव्यांग प्रवर्ग |
|---|---|---|
| १ | भूकरमापक | a. LV<br>b. HH<br>c. OA, OL, LC, Dw, AAV<br>d. ASD(M), SLD, MI<br>e. MD involving (a) to (d) above |

**ABBREVIATIONS USED :-** LV=Low Vision, HH=Hearing Handicapped, OA=One Arm, OL=One Leg, LC=Leprosy Cured, Dw=Dwarfism, AAV=Acid Attack Victims, ASD(M)=Autism Spectrum Disorder(Mild), SLD=Special Learning Disorder, MI= Mental Illness, MD=Multiple Disabilities.

दिव्यांग असणाऱ्या व्यक्तींकरीता (Person with disability) आरक्षित असलेल्या पदांवरील नियुक्तीसाठी संबधित प्रवर्गाचे किमान ४०% अपंगत्वाचे संबंधित जिल्हाच्या शासकीय रुग्णालयातील प्राधिकृत वैद्यकिय तज्ञाने दिलेले प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या नि:समर्थ असणाऱ्या उमेदवारांस (Person with disability) संबंधित वैद्यकिय मंडळाने त्या पदाचे कर्तव्य बजावण्यास शारिरीकदृष्टया पात्र ठरविल्यानंतरच प्रत्यक्ष नेमणूकी देण्यात येतील.

- दृष्टिहीन व ज्यांच्या लेखन गतीवर कायमस्वरुपी प्रतिकूल परिणाम झालेला आहे असे उमेदवार ऑनलाईन परीक्षेदरम्यान नियमानुसार लेखनिकाचा वापर करु शकतात. जेथे लेखनिक वापरला जाणार आहे, अशा सर्व प्रकरणांसाठी खालील नियम लागू होतील:-
    - उमेदवाराने ऑनलाईन अर्जात सादर केलेल्या माहितीच्या आधारे पुरविण्यात येणाऱ्या लेखनिकाची व्यवस्था विभागामार्फत करण्यात येणार आहे.
    - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील शासन परिपत्रक क्र. दिव्यांग २०१९/प्र.क्र.२००/दि.क.२,दि. ०५/१०/२०२१ मधील तरतुदींनुसार आवश्यक प्रमाणपत्रे अशा उमेदवाराला ऑनलाईन परीक्षेवेळी सादर करणे बंधनकारक राहील. असे प्रमाणपत्र सादर न केल्यास लेखनिक पुरविण्यात येणार नाही.
    - जे उमेदवार लेखनिकाचा वापर करतील त्यांना परीक्षेच्या प्रत्येक तासासाठी २० मिनीटे अतिरीक्त भरपाई वेळ देण्यात येईल.
    - दिव्यांग उमेदवाराने ऑनलाईन अर्जात मागणी केलेली असल्यास, केंद्र शासन /महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनांनुसार / निर्णयानुसार लेखनिक व भरपाई वेळेच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल.

- **अनाथ व्यक्तींचे आरक्षण :-**
    - महाराष्ट्र शासनाचे अनाथ आरक्षण धोरणानुसार शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग, क्रमांक अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दि. ०६ एप्रील, २०२३ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.
    - अनाथांसाठी “संस्थात्मक” व “संस्थाबाह्य” अशा दोन प्रकारामध्ये आरक्षण देय राहील.
    - अनाथ आरक्षण संदर्भात महिला व बाल विकास विभागाकडील शासन निर्णय दिनांक ०६/०४/२०२३, १०/०५/२०२३ व शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

- **माजी सैनिक आरक्षण :-**
    - सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्र. आरटीए १०७९/४८२/१६-अ, दि. १६/०४/१९८१ अन्वये माजी सैनिक उमेदवारांना समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे.
    - जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केले असल्याबाबत प्रमाणपत्र व सेवा तपशील दर्शवणारे अभिलेख प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
    - निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम प्राधिकारी यांचेकडून पडताळणी केल्याशिवाय त्यांना नियुक्ती देता येणार नाही.

- सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. आरटीए ९०९०/६२/प्र.क्र. २२२/२८, दि. ३० डिसेंबर, १९९१ अन्वये माजी सैनिकांना शासन सेवेत नागरी सेवेतील पदावर नियुक्तीसाठी देण्यात येणाऱ्या सवलतीचा त्यांनी एकदा फायदा घेतल्यावर नागरी सेवेतील पदावर नेमणुकीसाठी दुसऱ्यांदा तसा फायदा घेता येणार नाही.
- तसेच माजी सैनिक समांतर आरक्षणाच्या बाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्देशांनुसार कार्यवाही करण्यात येईल.

- प्रकल्पग्रस्त आरक्षण :-
  - सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. एईएम १०८०/३५/१६३, दि. २० जानेवारी, १९८० व शासन निर्णय क्र. भूकंप १००९/ प्र.क्र. २०७/२००९/१६३, दिनांक २७ ऑगस्ट २००९ नुसार प्रकल्पग्रस्तांसाठी समांतर आरक्षण लागू करण्यात आलेले आहे.
  - प्रकल्पग्रस्त या समांतर आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवाराकडे सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
  - उमेदवाराने सदर प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची मुळ प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

- भूकंपग्रस्त आरक्षण :-
  - सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. भूकंप १००९/प्र.क्र. २०७/२००९/१६३, दिनांक २७ ऑगस्ट २००९ नुसार प्रकल्पग्रस्तांसाठी समांतर आरक्षण लागू करण्यात आलेले आहे.
  - उमेदवाराकडे त्याबाबत शासनाने विहीत केल्यानुसार सक्षम प्राधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे. सदर भूकंपग्रस्त प्रमाणपत्राची मुळ प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

- महिला आरक्षण :-
  - महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. महिआ २०२३/ प्र.क्र. १२३/कार्या.-२, दि. ०४ मे, २०२३ अन्वये खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदांवरील निवडीकरीता खुल्या प्रवर्गातील महिलांनी तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेने रद्द करण्यात आलेली आहे.
  - मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) आणि विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील महिलांकरीता त्या त्या मागास प्रवर्गासाठी शासनाकडून वेळोवेळी विहीत करण्यात आल्याप्रमाणे नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

- **खेळाडू आरक्षण :-**
  - शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.राक्रीधो-१-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६, शासन शुध्दीपत्रक क्र.राक्रीधो-१-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुरो-२, दिनांक १०.१०.२०१७, तसेच शासन शुध्दीपत्रक क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.११ मार्च,२०१९, आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार, प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तीचे आरक्षण तसेच वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.
  - खेळाडू उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वीच वरील नमूद शासन निर्णयातील तरतूदीनुसार संबंधीत विभागाचे विभागीय उपसंचालक यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे खेळाडू उमेदवाराने अर्जासोबतच विभागीय उपसंचालक यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील. तसेच एकापेक्षा जास्त खेळाची प्राविण्य प्रमाणपत्रे असणाऱ्या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्र प्रमाणित करण्याकरीता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

- **पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन आरक्षण :-**
  - शासन निर्णय क्र. पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६अ, दि. २७/१०/२००९ नुसार अंशकालीन उमदेवार म्हणजे सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजने अंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार व मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेले पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार.
  - शासन निर्णय दि. २७/१०/२००९ अन्वये पदवीधर पदविकाधारक अंशकालीन या समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी सुशिक्षीत बेरोजगार या योजने अंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षे काम केल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये सदर अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र धारण केलेले असणे आवश्यक आहे.

- महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधि. क्र. ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि. २९ जानेवारी २००४ पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटात (क्रिमीलेअर) तथा वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज. (क), आणि भ.ज. (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी, ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे वर्ष २०२५-२६ करीता

वैध असलेले (दि.३१.०३.२०२६ पर्यंत वैध) नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

- विहित वयोमर्यादेतील शासकीय/निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांनी त्यांचा अर्ज त्यांचे विभागातील सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरावा. सदर पदाकरीता अर्ज भरण्यासाठी तसेच परीक्षेस बसण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याच्या पुर्व परवानगीची प्रत उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे व ती कागदपत्रे छाननीवेळी सादर करणे आवश्यक राहील.

- सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, २८ मार्च २००५ व शासन परीपत्रक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, ०१ जुलै २००५ व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये विहित केल्यानुसार शासनाने गट अ, ब, क, ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना "अ" आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन बंधनकारक आहे. सदर प्रतिज्ञापन कागदपत्र छाननीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. प्रतिज्ञापनाचा नमुना परिशिष्ट "अ" प्रमाणे आहे.

- ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही, निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविली असल्याचे आढळल्यास, एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

- ज्या उमेदवारांची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर होईल अशा उमेदवारास त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरते नियुक्ती आदेश देण्यात येतील. सदर आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधित उमेदवाराने जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे संबंधित कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार सहा महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र संबंधित कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

- सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

- अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहीत केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणाऱ्या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह ) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मुळ प्रवर्गासंबधातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

- अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना त्यांनी अर्ज सादर करताना निवडलेल्या भूमि अभिलेख विभागाच्या अधिपत्याखालील मुंबई (कोकण)/ पुणे/ नाशिक/ छ. संभाजीनगर/ अमरावती/ नागपूर या विभागात नियुक्ती देण्यात येईल.

- अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने सादर केलेली सर्व कागदपत्रे योग्य असल्याची व शासन निर्णयाच्या अटींची पूर्तता होत असल्याची खात्री झाल्यानंतरच नियुक्ती देण्यात येईल.

- निवड सूचीमधून उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस झाल्यानंतर शिफारस झालेला उमेदवार सदर पदावर हजर न झाल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास निवड सूचीतील प्रतिक्षा यादीवरील अतिरिक्त उमेदवारांमधून अन्य उमेदवारांची निवड करण्यात येईल.

- वि.जा. (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), भ.ज. (ड) या प्रवर्गाकरीता विहित केलेले आरक्षण त्या त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय राहील.

- तयार केलेली निवडसूची एक वर्षासाठी किंवा नवीन भरती प्रक्रियेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनाकांपर्यंत या दोन्हीपैकी जे आधीचे घडेल त्या दिनांकापर्यंत विधिग्राह्य असेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल. तथापि सदर विधीग्राह्य कालावधी मध्ये बदल करण्याचा अधिकार जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडे राहतील.

- काही अपरिहार्य कारणास्तव परीक्षेच्या तारखांमध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती विभागाच्या https://ibpsreg.ibps.in/gomsep25/ व https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

- मध्यस्थ/ ठग/ भूमि अभिलेख विभागाशी संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैर मार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या सूचना उमेदवारांस देण्यात येत आहेत.

- कोणत्याही कारणास्तव सदर जाहिरातीत दर्शविण्यात आलेली पदे अथवा सदरहू जाहिरात रद्द करण्याचा अधिकार भूमि अभिलेख विभाग राखून ठेवत आहे. सदर भरतीच्या नियम/ निकषांमध्ये भरती पूर्ण होईपर्यंत शासन निर्णय/ परिपत्रक/ विभागाच्या निर्णयानुसार बदल होऊ शकतो. कोणताही किंवा सर्व अर्ज त्यासाठी काहीही कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार भूमि अभिलेख विभाग राखून ठेवीत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन)
नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना "अ"
प्रतिज्ञापत्र
**नमुना अ**

मी, श्री /श्रीमती/कुमारी ______________________________ श्री____________________________ यांचा/यांची मुलगा / मुलगी/ पत्नी वय______वर्ष _________राहणार________________________ याव्दारे पुढीलप्रमाणे जाहिर करतो/करते की, मी ________________________ या पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

आज रोजी मला ______(संख्या) इतकी हयात मुले / मुली आहेत. त्यापैकी दि. २८ मार्च २००५ यानंतर मला झालेल्या मुलांची संख्या ______ आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा).

हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण:
दिनांक:

(अर्जदाराची सही)

## --: ऑनलाईन अर्ज सादर करण्याची पध्दत :--

१) उपरोक्त पदांकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सुविधा दि. ०१/१०/२०२५ ते २४/१०/२०२५ पर्यंत https://ibpsreg.ibps.in/gomsep25/ व https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

२) विहित पध्दतीने माहिती सादर करुन दिनांक २४/१०/२०२५ अखेर अर्ज सादर केलेल्या उमेदवारांसाठी शुल्क भरण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने रक्कम भरण्याची कार्यवाही दि.२४/१०/२०२५ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

३) परीक्षा स्थगित व रद्द करणे, परीक्षेचे स्वरुप, परीक्षेची तारीख व ठिकाणात बदल करणे, पदसंख्या वाढ किंवा घट करण्याचे अधिकार विभागास रहातील व विभागाचा निर्णय अंतिम असेल. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही. तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वा तक्रारीबाबत निर्णय घेण्याचा अधिकार विभागास राहील व विभागाचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

४) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपुर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहीरातीत नमूद केलेल्या सर्व अटी व पात्रता तपासूनच उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरावा.

५) उमेदवारांची परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्व तपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे केवळ या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे तसेच त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरीम यादी प्रसिद्ध करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवाराला भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे सर्व अधिकार नियुक्ती प्राधिकारी राखून ठेवीत आहेत.

६) उमेदवारास परीक्षा / कागदपत्र पडताळणीस स्वखर्चाने यावे लागेल.

७) ऑनलाईन परीक्षा स्थळामध्ये वाढ / बदल करण्याचे अधिकार विभागाकडे राहतील. पदभरती प्रक्रियेच्या अनुषंगाने जाहीर सुचना तसेच परीक्षेचे ठिकाण, वेळ व दिनांक उक्त संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

८) परीक्षेचे प्रवेशपत्र उक्त संकेतस्थळावरुन स्वतंत्र लिंक द्वारे उपलब्ध करुन दिले जाईल व उमेदवाराने स्वत: डाऊनलोड करुन घेण्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची असेल. परीक्षेचे प्रवेशपत्र इतर कोणत्याही पद्धतीने पाठविले जाणार नाही.

९) पात्र उमेदवारांचा अंतिम निकाल विभागाच्या https://ibpsreg.ibps.in/gomsep२५/ व https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

**१०) उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्यापूर्वी लक्षात घेण्यासारखे महत्वाचे मुद्दे :-**

**१०.१ ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी खालील प्रमाणे आवश्यक कागदपत्रे / स्वाक्षरी इत्यादीचे स्कॅन करुन ठेवावे**

१ छायाचित्र (४.५ सें.मी.x ३.५ सें.मी.)

२ स्वत:ची स्वाक्षरी ( काळ्या शाईने)

३ स्वतःच्या डाव्या अंगठ्याचा ठसा (काळ्या किंवा निळ्या शाईने पांढऱ्या कागदावर)

४ इंग्रजी भाषेतील खाली दिलेला मजकुर असलेले स्वहस्ताक्षरात लिहिलेले घोषणापत्र (काळ्या शाईने पांढन्या कागदावर)

५ हे सर्व स्कॅन केलेले दस्तऐवज या जाहिरातीतील पुढे नमूद तपशिलाप्रमाणे आहेत याची खात्री उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी करावी

६ इंग्रजी भाषेतील मोठ्या अक्षरातील (Capital Letters) स्वाक्षरी स्विकारली जाणार नाही.

७ डाव्या अंगठ्याचा ठसा योग्यरित्या स्कॅन केलेला असावा आणि त्यावर डाग येऊ देऊ नये. (उमेदवारास अंगठा नसल्यास असा उमेदवार अर्ज करण्यासाठी उजव्या अंगठ्याचा वापर करु शकतो.

**१०.२ हस्तलिखित घोषणेचा मजकूर खालील प्रमाणे आहे.**

| Declaration |
|---|
| I, (name of the candidate) hereby declare that all the informantion submitted by me in the application form is correct, true and valid. I will present the supporting documents as and when required. |

१०.३ वर नमूद केलेले घोषणापत्र उमेदवाराने स्वहस्तलिखित आणि फक्त इंग्रजी भाषेत लिहिलेले असावे. इतर कोणत्याही भाषेत लिहिलेले आणि अपलोड केले असल्यास, त्या उमेदवाराचा अर्ज अवैध मानला जाईल. (दृष्टीहीन उमेदवारांच्या बाबतीत स्वहस्ते लिहू

शकत नाहीत त्यांनी घोषणेचा मजकूर टाईप करून टाईप केलेल्या घोषणेच्या खाली डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा लावावा आणि तपशिलानुसार कागदपत्र अपलोड करावे.)

१०.४ ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणा करण्यासाठी आवश्यक सर्व माहिती व कागदपत्रे तयार ठेवावीत.

१०.५ उमेदवारांकडे स्वतःच्या चालू स्थितीतील वैध वैयक्तिक ई-मेल आयडी आणि भ्रमणध्वनी (मोबाईल क्रमांक असावा, स्वत:चा ई-मेल आयडी नसल्यास तयार करून घेण्यात यावा) वैयक्तिक ई-मेल आयडी आणि भ्रमणध्वनी क्रमांक सदरची भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत चालू (सक्रिय) ठेवावा, नोंदणीकृत ई-मेल आयडीद्वारे परीक्षेसाठी प्रवेश पत्र डाउनलोड करण्यासाठी सूचना देण्यात येतील.

## ११. अर्ज भरण्याची कार्यपद्धती आणि सुचना :-

### ११.१ अर्ज नोंदणी-

१ उमेदवाराला https://ibpsreg.ibps.in/gomsep२५/ व https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०१/१०/२०२५ पासुन उपलब्ध होणाऱ्या लीकवर लॉगिन (Login) करावे लागेल.

२ उमेदवारानी लिंक वर जाऊन ऑनलाईन अर्ज करावा (APPLY ONLINE) या पर्यायावर क्लिक (Chick) केल्यावर एक नवीन स्क्रीन उघडेल.

३ अर्ज नोंदणी करण्यासाठी, “नवीन नोंदणीसाठी येथे क्लिक करा” (Click here for New Registration) निवडा आणि नाव, संपर्क तपशील आणि ई-मेल आयडी प्रविष्ट करा. प्रणालीद्वारे तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड तयार केला जाईल आणि स्क्रीनवर प्रदर्शित केला जाईल, उमेदवाराने तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड नोंदवावा तात्पुरता नोंदणी क्रमांक (Registration No) आणि पासवर्ड (Password) दर्शविणारा ई-मेल आणि एसएमएस देखील पाठविला जाईल.

४ जर उमेदवार एकाच वेळी अर्ज भरू शकत नसेल, तर तो “जतन करा पुढे जा” (SAVE AND NEXT) टेब निवडून आधी भरलेली माहिती जतन करू शकतो. ऑनलाईन अर्ज सबमिट करण्यापूर्वी उमेदवारांनी ऑनलाईन अर्जातील तपशिलांची पडताळणी करण्यासाठी व आवश्यक बदल करण्यासाठी “जतन करा पुढे जा” (SAVE AND NEXT) सुविधेचा वापर करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. दृष्टिहीन उमेदवारांनी अर्ज काळजीपूर्वक भरावा आणि अंतिमरित्या सादर करण्यापूर्वी ते योग्य असल्याची खात्री करण्यासाठी तपशीलांची पडताळणी करून घ्यावी.

५ उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये तपशील काळजीपूर्वक भरावेत आणि त्याची पडताळणी स्वत करावी एकदा “पूर्ण नोंदणी बटणावर” (COMPLETE REGISTRATION BUTTON) क्लिक केल्यानंतर अर्जामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

६ उमेदवाराने स्वतःचे नाव, त्याचे/तिचे किंवा वडील/पतीचे नाव जसे प्रमाणपत्रे/गुणपत्रिका/ओळखपत्र पुराव्यामध्ये नमूद आहे, त्याप्रमाणेच अर्जामध्ये नमूद करण्यात यावे. उमेदवाराच्या ओळखपत्र / पुराव्यामधील नाव व अर्जामध्ये नमूद केलेले नाव यामध्ये कोणताही बदल आढळल्यास उमेदवारी अपात्र ठरू शकते.

७ उमेदवारांनी अर्जामध्ये नमूद केलेले तपशील सत्यापित (Validate) करून आपला अर्ज जतन करण्यासाठी Validate your details व Save and Next बटणावर क्लिक (Click) करून अर्ज जतन करावा.

८ या सुचनांतील पुढील मुद्यांमध्ये छायाचित्र आणि स्वाक्षरी स्कॅनिंग आणि अपलोड करण्याच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये नमूद केलेल्या तपशिला नुसार उमेदवार त्यांचे फोटो व स्वाक्षरी अपलोड करू शकतील.

९ उमेदवाराने त्यांचे इतर तपशील अर्जामध्ये नमूद करावेत.

१० अर्जाच्या संपूर्ण नोंदणीपूर्वी अर्जदाराने आपल्या अर्जाचे पूर्वावलोकन आणि पडताळणी करण्यासाठी Preview बटणावर क्लिक करून अर्जाचे पूर्वावलोकन व पडताळणी करावी. भरलेले अर्ज, (छायाचित्र, स्वाक्षरी आणि इतर तपशिल) बरोबर असल्याची पडताळणी आणि खात्री केल्यानंतरच COMPLETE REGISTRATION ONLY / नोंदणी पूर्ण बटनावर क्लिक करा.

११ परीक्षा शुल्क भरणा करण्यासाठी (Payment) टॅबवर क्लिक (Click) करुन शुल्क भरण्यासाठी (Fees Payment) साठी पुढे जावे.

१२ सादर (Submit) बटणावर क्लिक (Click) करावे.

**टीप :** (अ) USERNAME आणि PASSWORD जतन करण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल.

(ब) उमेदवाराने नोंदणी प्रक्रियेसाठी स्वत:चाच वैध/ प्रमाणित ई-मेल आयडी वापरावा. अन्य व्यक्तींचा ई-मेल आयडी वापरू नये.

### ११.२ ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे :

१ ऑनलाईन अर्ज परीक्षा शुल्कासह भरण्याची सुविधा (payment gateway) उपलब्ध करण्यात आलेली आहे. त्यानुसार परीक्षा शुल्क भरण्याबाबत दिलेल्या सूचनांचे अनुसरण करून परीक्षा शुल्क भरणा करण्यात यावा.

२ परीक्षा शुल्क भरणा डेबिट कार्ड (RuPay/Visa/MasterCard/Maestro), क्रेडिट कार्ड, इंटरनेट बैंकिंग, IMPS, कैश कार्ड/UPI/मोबाइल वॉलेट वापरून केले जाऊ शकते.

३ ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने परीक्षा शुल्क भरल्या बाबतची माहिती सादर केल्यानंतर, कृपया सर्व्हरकडून प्रतिसाद मिळण्याची प्रतीक्षा करा. परीक्षा शुल्क भरण्याबाबत पुनरावृत्ती टाळण्यासाठी मागे (Back)/ रिफ्रेश (Refresh) बटण (Key) दाबू नये.

४ व्यवहार यशस्वीरित्या पूर्ण झाल्यावर एक ई-पावती (E-Receipt) तयार होईल, ती जनत करुन ठेवावी.

५ ई पावती (E-Receipt) तयार न होणे हे परीक्षा शुल्क भरणा अयशस्वी झाल्याचे दर्शवते. Payment अयशस्वी झाल्यास, उमेदवारांनी त्यांचा तात्पुरता नोंदणी क्रमांक (Registration No) आणि पासवर्ड (Password) वापरून पुन्हा लॉग इन करावे आणि Payment वी प्रक्रिया पुन्हा पूर्ण करावी.

६ उमेदवारांनी परीक्षा शुल्क भरल्याची ई-पावती (E-Receipt) आणि फी चा तपशील असलेल्या ऑनलाईन अर्जाची मुद्रित प्रत (Print out) काढून घेणे आवश्यक आहे. ई- पावती व अर्जाची प्रत न आल्यास ऑनलाईन व्यवहार यशस्वी झाला नसल्याचे समजावे.

७ क्रेडिट कार्ड वापर कर्त्यासाठी: परीक्षा शुल्क भारतीय रुपयामध्ये सूचीबद्ध असल्याने तुम्ही विदेशी क्रेडिट कार्ड वापरत असल्यास, तुमची बँक प्रचलित विनिमय दरांवर आधारीत तुमच्या स्थानिक चलनात रूपांतरीत करेल.

८ तुमच्या डेटाची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी, कृपया तुमचा व्यवहार पूर्ण झाल्यावर ब्राउझर विडो (Browser Window) बंद करा.

९ फी भरल्याचा तपशील असलेल्या अर्जाची मुद्रीत प्रत (Printout) काढण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

## ११.३ स्कॅनिंग आणि कागदपत्रे अपलोड करण्यासाठी मार्गदर्शक सुचना:

ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी उमेदवाराकडे खाली दिलेल्या तपशीलानुसार त्याचे छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा आणि स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र यांची स्कॅन केलेली (डिजीटल) प्रतिमा असणे आवश्यक आहे.

**१ छायाचित्र प्रतिमा (४.५ सें.मी x ३.५ सें.मी.)**

१. छायाचित्र अलीकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचे रंगीत असणे आवश्यक आहे.

२. छायाचित्र रंगीत, हलक्या रंगाच्या विरुद्ध, शक्यतो पांढऱ्या पार्श्वभूमीवर घेतलेले असावे.

३. कॅमेऱ्याकडे शांतपणे व स्थिर नजरेने पहावे.

४. छायाचित्र सुर्यप्रकाशात काढलेले असेल तर आपल्या छायाचित्रावर सावली पडणार नाही याची दक्षता घ्यावी.
५. फ्लॅश वापरायचा असल्यास “Red Eye” येणार नाही याची काळजी घ्यावी.
६. जर तुम्ही चष्मा घालत असाल तर त्यात कोणतेही प्रतिबिंब येणार नाही आणि तुमचे डोळे स्पष्टपणे दिसत आहेत याची खात्री करा.
७. छायाचित्र काढतेवेळी टोपी, हॅट व गडद चष्मा घालू नये. धार्मिक पगडी वापरण्यास परवानगी आहे, मात्र त्यामुळे तुमचा चेहरा झाकता कामा नये.
८. छायाचित्राचे परिमाण प्राधान्याने २००x२३० पिक्सेल असावे.
९. छायाचित्राच्या फाईलचा आकार २० kb ते ५० kb दरम्यान असावा.

**११.३ २ स्वाक्षरी, डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा आणि स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र :-**

१. अर्जदाराने पांढऱ्या कागदावर काळ्या शाईच्या पेनने स्वाक्षरी करावी.
२. स्वाक्षरी स्कॅन करताना प्राधान्याने परिमाण १४०x६० पिक्सेल असावे.
३. स्कॅन केलेल्या फाईलचा आकार १० kb ते २०kb असावा.
४. अर्जदाराने त्याच्या डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा काळ्या किंवा निळ्या शाईने पांढऱ्या कागदावर लावावा.
५. अंगठ्याच्या ठशाची प्रतिमा *.jpg/*.jpeg फॉरमॅट मध्ये असावी.
६. स्कॅन केलेल्या फाईलचे परिमाण -२०० DPI मध्ये २४०x२४० पिक्सेल मध्ये व ३ से.मी x ३से.मी. आकारात असावे.
७. अंगठ्याचा ठसा स्कॅन केलेल्या फाईलचा आकार २० kb ते ५० kb असावा.
८. अर्जदाराने पांढऱ्या कागदावर काळ्या शाईने स्पष्टपणे इंग्रजीमध्ये विहीत केलेली घोषणा लिहावी.
९. घोषणापत्र *.jpg/*.jpeg फॉरमॅट मध्ये स्कॅन केलेले असावे.
१०. घोषणापत्र स्कॅन केलेल्या फाईलचे परिमाण -२०० DPI मध्ये ८००x४०० पिक्सेल मध्ये व १० से.मी x ५ से.मी. आकारात असावे.
११. घोषणापत्र स्कॅन केलेल्या फाईलचा आकार ५० kb ते १०० kb असावा.
१२.स्वाक्षरी,डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा आणि स्वहस्ताक्षरातील घोषणापत्र हे उमेदवाराचे असावे. इतर कोणत्याही व्यक्तीचे नसावे.
१३. परीक्षेच्या वेळी वरील बाबी जुळत नसल्यास अर्जदारास अपात्र घोषीत केले जाईल.
१४. इंग्रजी मोठ्या वर्णाक्षरातील (Capital Letters) स्वाक्षरी / हस्तलिखीत घोषणापत्र स्विकारले जाणार नाही.

११.३ ३ कागदपत्रे स्कॅन करणे:-

१. स्कॅनर रिझोल्यूशन किमान २०० dpi वर सेट करा.
२. रंग मुळ रंगावर सेट करा.
३. फोटो, स्वाक्षरी व अंगठ्याच्या ठश्याच्या स्कॅन फाईलचा आकार वर नमुद केल्याप्रमाणे असावा.
४. स्कॅनरमधील प्रतिमा छायाचित्र / स्वाक्षरी / डाव्या अंगठ्याचा ठसा / हाताने लिहीलेल्या घोषणेच्या काठावर क्रॉप करा. नंतर प्रतिमा अंतिम आकारात क्रॉप करून अपलोड करावी (वर नमूद केल्याप्रमाणे).
५. स्कॅन केलेली फाईल ही jpg किंवा jpeg या फॉरमॅट मध्येच असावी. व वर नमूद केल्याप्रमाणे विहीत आकारातील असावी.

११.३ ४ कागदपत्रे अपलोड करण्याची प्रक्रिया :-

१. ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराला छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र अपलोड करण्यासाठी स्वतंत्र लिंक प्रदान केल्या जातील.
२. संबंधित लिंकवर क्लिक केल्यानंतर स्कॅन करुन जतन केलेल्या फाईलचे ठिकाण ब्राउज करुन निवडावे व छायाचित्र स्वाक्षरी अपलोड करा / डाव्या अंगठ्याचा ठसा /स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र अपलोड करा.
३. निवडलेल्या फाईलचा आकार आणि स्वरुप निर्धारीत केल्याप्रमाणे नसल्यास स्क्रीनवर त्रुटी संदेश प्रदर्शित केला जाईल.
४. त्यानुसार आवश्यक ती दुरूस्ती करुन पुन्हा अपलोड करावे.
५. उमेदवाराने स्वत:चा फोटो, स्वाक्षरी, डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा आणि विनिर्दीष्ट केल्याप्रमाणे स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र अपलोड केल्याशिवाय त्यांचा ऑनलाईन अर्ज अपलोड होणार नाही.

टिप:-

१. छायाचित्रातील चेहरा किंवा स्वाक्षरी किंवा डाव्या अंगठ्याचा ठसा किंवा स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र अस्पष्ट असल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारला जाऊ शकतो.
२. उमेदवाराने ऑनलाईन अर्जामध्ये छायाचित्र / स्वाक्षरी / डाव्या अंगठ्याचा ठसा स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र अपलोड केल्यानंतर उमेदवारांनी त्यांच्या प्रतिमा स्पष्ट आहेत आणि योग्य रित्या अपलोड केल्या आहेत हे तपासावे.

छायाचित्र/स्वाक्षरी/डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा/स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र ठळकपणे दृश्यमान नसल्यास, उमेदवार आपला अर्ज संपादित (Edit) करू शकतो आणि त्याचे छायाचित्र/स्वाक्षरी/डाव्या अंगठ्याचा ठसा/हाताने लिहिलेली घोषणा फॉर्म सबमिट करण्यापूर्वी पुन्हा अपलोड करू शकतो.

३. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज करतेवेळी त्याचा फोटो व स्वाक्षरी ज्या ठिकाणी फोटो अपलोड करणे अपेक्षित आहे त्याच ठिकाणी अपलोड केले आहे याची खात्री करावी. फोटोच्या जागी फोटो आणि स्वाक्षरीच्या जागी स्वाक्षरी अपलोड केलेली नसल्यास उमेदवाराला परीक्षेला बसू दिले जाणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची असेल.
४. उमेदवाराने अपलोड करावयाचा फोटो आवश्यक आकाराचाच आहे व त्यामध्ये उमेदवाराचा चेहरा स्पष्टपणे दिसत आहे हे सुनिश्चित केले पाहिजे.
५. उमेदवारांनी अपलोड केलेली स्वाक्षरी स्पष्टपणे दिसत असल्याची खात्री करावी.
६. ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर उमेदवारांनी त्यांच्या प्रणालीद्वारे तयार केलेल्या ऑनलाईन अर्जाची मुद्रीत प्रत (Print out) काढून घ्यावी.

## १२. अर्ज करण्यासाठी इतर सुचना :-

| | | |
|---|---|---|
| १२ | १ | उमेदवाराचे नाव, वडिलांचे, पतीचे नाव, आडनाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी, पत्रव्यवहाराचा पत्ता ही मुलभूत माहिती उमेदवाराने सविस्तर द्यावी. |
| | २ | पत्ता नमूद करताना उमेदवाराने आपल्या पत्याचा प्रकार निश्चित करावा. (उदा. पत्रव्यवहाराचा पत्ता व कायमचा पत्ता (किंवा दोन्ही) ) |
| | ३ | त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी. |
| | ४ | ज्यांच्याकडे आधार क्रमांक आहे त्यांनी त्या संबंधित माहिती भरावी. तसेच उमेदवाराने आधार क्रमांक /आधार नोंदणी क्रमांक याबद्दलची माहिती द्यावी. |
| | ५ | मराठी भाषेतील प्राविण्य, MS-CIT प्रमाणपत्र (D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र) या संबंधीची माहिती भरावी. |

| | | |
|---|---|---|
| | ६ | एकदा शैक्षणिक तपशिल प्रविष्ट केल्यानंतर अर्जदाराने पुढे (Next) या बटणावर क्लिक करावे. त्यानंतर अर्जदाराला पुष्टीची विनंती केली जाईल. त्यांनी ते बटन क्लिक केल्यानंतर मागील माहिती / तपशील बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही. त्यामुळे क्लिक करण्यापुर्वी भरलेल्या माहितीची पुष्टी करावी. |
| | ७ | उमेदवारास ज्या विभागाकरीता अर्ज करायचा आहे त्या विभागाची निवड करावी लागेल. |
| | ८ | ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेस दि. २४/१०/२०२५ रोजी रात्री २३.५९ वाजता पुर्ण संकेतस्थळाची लिंक बंद होईल. |
| | ९ | **कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉगिन आयडी सह नोंदणी केली असेल तर उमेदवाराची सगळ्यात शेवटी केलेली यशस्वी नोंदणी पुढील प्रक्रियेसाठी जसे की, परीक्षा प्रवेशपत्र, परीक्षेत उपस्थिती, गुणवत्ता यादी व अन्य संबंधीत प्रक्रियांसाठी विचारात घेतली जाईल. उमेदवारास ऑनलाईन अर्ज करताना कोणतीही शंका असल्यास त्याबाबत** https://cgrs.ibps.in/ **या** helpdesk link **वर अथवा १८००२२२३६ व १८००१०३४५६६ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधता येईल.** |
| | टिप- नोंदणीमधील तपशील जसे की वापरकर्ता नाव (USERNAME), ई-मेल आयडी, पसंतीचे स्थान, जन्म तारीख, उमेदवाराचे छायाचित्र (Photograph) आणि स्वाक्षरी इ. आवेदनपत्र सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही. | |
| | १० | **अर्जातील माहितीचे पूर्वावलोकन-** |
| | | १. युजरनेम व पासवर्ड वापरून लॉग इन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो. |
| | | २. अर्ज प्रिंट करण्यासाठी प्रिंट प्रिव्ह्यूव्ह (Print Priview) या पर्यायावर क्लिक करा. नोंद- उमेदवाराने आपला pdf स्वरुपातील अर्ज, परीक्षा प्रवेशपत्र संपूर्ण भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत स्वत: जतन करुन ठेवणे अनिवार्य आहे. |

## १३. परीक्षा केंद्र व परीक्षेबाबतच्या सर्वसाधारण सुचना :-

| | | |
|---|---|---|
| १३ | १ | **उपलब्ध परीक्षा केंद्र-** उपलब्ध परीक्षा केंद्राची माहिती ऑनलाईन अर्जात देण्यात आलेली आहे. त्यानुसार उमेदवाराने परीक्षाकेंद्राचे ३ पसंतीक्रम निवडण्याचे आहेत. परंतू तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास अपवादात्मक दृष्ट्या प्रशासकीय कारणास्तव परीक्षाकेंद्र इतरत्र ठेवण्यात येईल. |
| | २ | **परीक्षेबाबतच्या सर्वसाधारण सुचना:-** |
| | | १. उमेदवारांना नेमून दिलेले परीक्षा केंद्र व त्याचा पत्ता प्रवेश पत्रात नमूद करण्यात येईल व संबंधीत परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेतली जाईल. |

| | | |
|---|---|---|
| | | २. उमेदवाराला त्याने नोंदविलेल्या पसंतीनुसार परीक्षा केंद्र देण्याचा प्रयत्न केला जाईल तथापि परीक्षा आयोजनाच्या दृष्टीने इतर परीक्षा केंद्र देण्यात येईल. परीक्षा केंद्र / स्थान / तारीख/वेळ बदलण्याची कोणतीही विनंती कोणत्याही परिस्थितीमध्ये (वैद्यकीय वा इतर कारणास्तव) स्विकारली जाणार नाही. उमेदवाराने त्याची प्रवासाची व्यवस्था त्यानुसार आधीच ठरवावी. |
| | | ३. उमेदावाराला त्याने / तिने निवडलेल्या केंद्राव्यतिरीक्त इतर कोणतेही केंद्र वाटप करण्याचा अधिकार तसेच कोणतेही परीक्षा केंद्र रद्द करणे आणि / किंवा परीक्षा केंद्र वाढविणे याचे अधिकार भूमि अभिलेख विभागाला असतील. |
| | | ४. उमेदवाराने भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परीस्थितीमध्ये (अनेकदा अर्ज भरणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे, इत्यादी कारणास्तव) परत केले जाणार नाही. |